Registered with the Registrar of news papers for India under No. 20826 / 1971

मूल्य : रु. ५/-

मासिक

# वैश्य विजय

कोंकणस्थ (संगमेश्वरी) वैश्य समाजाचे मुखपत्र



वैश्य महाजनवाडी, ६ शेणवीवाडी, खाडिलकर रोड, मुंबई - ४.

वर्ष ४४ वे | एप्रिल २०१६ | अंक ४ था (पृष्ठ १६)

## प्रथम स्मृतीदिनाप्रित्यर्थ देणगी



मुंबई विडी तंबाखू व्यापारी सहकारी पतपेढीचे दिर्घकाळ संचालक व माजी अध्यक्ष, संस्थेचे माजी विश्वस्त स्व. शंकर तुकाराम तथा भाई नारकर यांच्या प्रथम स्मृतिदिन्नानिमित्त रु. ५०००/- ची देणगी संस्थेच्या अनाथ-पंगू निधीस त्यांच्या कुटुंबियांनी दिल्याबद्दल संस्थेच्या वतीने आभार! तसेच त्यांचे कुटुंबीय व संस्थेच्या वतीने स्व. भाई नारकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## शिक्षण समितीस देणगी



ज्येष्ठ समाज भगिनी श्रीमती नम्रता प्रकाश तोडकरी व श्री. विकास प्रकाश तोडकरी (विरार) यांनी कै. प्रकाश शिवराम तोडकरी यांच्या स्मरणार्थ मातृसंस्थेच्या शिक्षण समितीस रु.१०,०००/- ची देणगी दिल्याबद्दल संस्थेच्या वतीने तोडकरी कुटुंबियांचे आभार!

## संस्थेत गुढीपाडवा संपन्न



साडेतीन मुहूर्तांपैकी पहिला मुहूर्त म्हणजे गुढीपाडवा! मराठी वर्षातील प्रथम दिवस! संस्थेच्या महाजनवाडीत वधू-वर सूचक समितीचे चिटणीस मनोहर खातू यांनी गुढी उभारली. यावर्षी आपण सर्वांनी समाजाच्या सर्वांगीण विकासाचा मनोदय अंत:करणात ठेऊन एकजुटीने कार्य करूया! विविधांगी कार्यक्रमातून कोंकणस्थ वैश्य समाजबांधव एकत्रीत आणूया. एकमेकांच्या सहकार्याने प्रगती व विकास साधूया! असा संकल्प करून माजी विश्वस्त, वैश्य गौरव श्री. भालचंद्र ऊर्फ बंधु कोलगे, विश्वनाथ खातू, प्रदिप सिताराम गांगण, संदीप पवार तसेच इतर बहुसंख्य समाजबांधवांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.